जा.क्र.मपविम/प्रापवियो/२००९-१०/605
जिल्हा नियोजन समिती
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
दिनांक : 20/०५/२०१०

**निधी वितरण आदेश**

**विषय :- मराठवाडा एकात्मीक विकास योजनेंतर्गत प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम-२००९-१०**
अंतर्गत निधी वितरत करणेबाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.टीडीएस-२०१०/३/प्रक्र.१७६/पर्यटन,मंत्रालय,मुंबई दिनांक-३१ /०३/२०१०

उपरोक्त विषयाचे संदर्भात संदभीय शासन निर्णयान्वये प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत सन २००९-१० साठी परिशिष्ट "अ "मधील रु.१५०.०० लक्ष **(अक्षरी रुपये एक कोटि पन्नास लाख फक्त)** निधीच्या पंधरा कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन जिल्हाधिकारी हिंगोली यांचेकडे निधी वर्ग करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडुन प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत रुपये १५०.०० लक्ष निधी वरील संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये प्राप्त झालेले आहे. परिशिष्ट ' अ ' मध्ये दर्शविण्यात आलेल्या पंधरा कामासाठी संबधित कार्यान्वित यंत्रणेस तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून त्याच कामावर खालील अटीच्या आधीन राहून धनादेशाव्दारे निधी वितरीत करण्यात येत आहे.

**योजना राबवितांना खालील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.**

१.या आदेशान्वये वितरीत करण्यात येणारा निधी त्याच कामावर खर्च करण्यात यावा.
२.कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधीत यंत्रणेची राहील.
३.सदरील कामे विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील.
४.प्रत्येक कामाच्या प्रगतीची माहिती विहित प्रपत्रात संबधीत यंत्रणेने कळवावी.
५.शासनाचे प्रचलीत नियम व विहित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.
६.बांधकामाचे बाबतीत जागा शासकीय असल्याची खात्री करुन घ्यावी.
७.काम पूर्ण झाल्यांनतर " पूर्णत्वाचे प्रमाणपत्र " व " उपयोगिता प्रमाणपत्र " या कार्यालयाकडे सादर करावे.
८.महालेखापाल कार्यालयाशी खर्चाचे ताळमेळ,विनियोजन लेखे,लेखा परिक्षण याबाबतची कार्यवाही यंत्रणा करील.
९.कामासंबधी लेखा आक्षेप,लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज याबाबतची जबाबदारी यंत्रणेची राहील.
१०.कामनिहाय खर्चाचा मासिक प्रगती अहवाल विहित नमुण्यांत दरमहा ५ तारखेपूर्वी या कार्यालयास सादर करावा.
११.या योजनेंतर्गत घेण्यात येणारी कामे स्वतंत्रपणे वेगळी असावीत.

**या कामावर होणारा खर्च खालील लेखा शिर्षातून भागविण्यात यावा.**

**मुख्य लेखा शिर्ष: ३४५२ - पर्यटन**
**मागणी क्र. :०१ -पर्यटनासाठी पायाभुत सुविधा,**
**१०१- पर्यटन केंद्र (०२)**
**पंचवार्षिक योजनांतर्गत योजनाराज्य योजना -**
**(०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणी**
**मुलभुत सुविधासाठी अनुदान (३४५२ १९५८)**

**स्वाक्षरीत/-**
**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती हिंगोली.**

**प्रत :-** 1. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
2. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
3. कार्यकारी अभियंता,पुर्णा पाटबंधारे विभाग,वसमतनगर जि. हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
4. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
5. जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली यानां माहीतीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव
6. लेखा शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना माहिती व पुढील योग्य त्याकार्यावाहीस्तव देण्यात येते
7. अध्यक्ष श्री. नागनाथ संस्थान औंढा (ना.) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

मुळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी व
सदस्य सचिव यांची स्वाक्षरी आहे.

**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती हिंगोली.**

# परिशिष्ट " अ "

## मराठवाडा एकात्मीक विकास योजनेंतर्गत प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रम

(रुपये लाखात)

| अ. क्र | कार्यान्वयीन यंत्रणेचे / कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता वर्ष | प्रशासकीय मान्यता किंमत | यापुर्वी धनादेशाव्दारे निधी वितरण | या आदेशान्वये धनादेशाव्दारे निधी वितरीत | एकुण धनादेशाव्दारे निधी वितरण |
|---|---|---|---|---|---|---|
| | का. अ. पूर्णा पाटबंधारे विभाग वसमतनगर, ता.वसमत जि. हिंगोली. | | | | | |
| | (अ )सिध्देश्वर धरणस्थळी पर्यटन विकास | | | | | |
| १ | पाऊलवाटेचे बांधकाम करुन दोन्ही बाजुने कर्ब (१०० मीटर) | २००९.१० | ४.०९ | ०.०० | ४.०९ | ४.०९ |
| २ | हायमास्ट दिवे पुरवठा व लावणे | २००९.१० | ३.११ | ०.०० | ३.११ | ३.११ |
| ३ | पेव्हींग ब्लॉकचे पायवाट तयार करुन दोन्ही बाजने कर्ब लावणे | २००९.१० | २.०५ | ०.०० | २.०५ | २.०५ |
| ४ | शौचकुपाचे बांधकाम करणे (सेप्टीक टॅक) | २००९.१० | ०.९१ | ०.०० | ०.९१ | ०.९१ |
| ५ | सुलभ शौलाचयाचे बांधकाम करणे | २००९.१० | ६.६२ | ०.०० | ६.६२ | ६.६२ |
| ६ | बोट थांबण्यासाठी धक्का बांधकाम रणे (जेटी) | २००९.१० | १०.१२ | ०.०० | १०.१२ | १०.१२ |
| ७ | तारेचे कुंपण व प्रवेशव्दार (गेट) बांधकाम करणे | २००९.१० | २.०९ | ०.०० | २.०९ | २.०९ |
| ८ | बगीच्यामध्ये बेंचेस,कचरा पेटी व सिंगनेजस इ. बांधकाम | २००९.१० | २.८५ | ०.०० | २.८५ | २.८५ |
| ९ | बगीच्यासाठी ठिबक सिंचनाची व्यवस्था करणे | २००९.१० | ४.६१ | ०.०० | ४.६१ | ४.६१ |
| १० | बोट व धक्का (जेटी) पुरवठा करणे. | २००९.१० | १३.०९ | ०.०० | १३.०९ | १३.०९ |
| | एकुण (अ) | | ४९.६२ | ०.०० | ४९.६२ | ४९.६२ |
| | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,हिंगोली | | | | | |
| | (ब) औंढा,नागनाथ ज्योर्तिलिंग पर्यटनस्थळ विकास | | | | | |
| १ | पश्चिम व्दारासमोरील बाजुस बंद नालिचे व रस्त्याचे बांधकाम | २००९-१० | ९.६७ | ०.०० | ९.६७ | ९.६७ |
| २ | पश्चिम व्दारासमोरील बाजूस कॉक्रिट ठोकळयाचे बांधकाम | २००९-१० | ८.०० | ०.०० | ८.०० | ८.०० |
| ३ | वाहनतळ विस्तार | २००९-१० | १८.६७ | ०.०० | १८.६७ | १८.६७ |
| ४ | सुलभ शौचालयाकडे जाणा-या रस्ताचे व नालिचे बांधकाम | २००९-१० | ५.३५ | ०.०० | ५.३५ | ५.३५ |
| | एकूण ब | | ४१.६९ | ०.०० | ४१.६९ | ४१.६९ |
| | का.अ.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, हिंगोली. | | | | | |
| | (क) (१) औंढा,नागनाथ ज्योर्तिलिंग पर्यटनस्थळ विकास | | | | | |
| .१ | पाणीपुरवठा योजना | २००९-१० | ५८.६९ | ०.०० | ५८.६९ | ५८.६९ |
| | एकूण (क) (१) | | ५८.६९ | ०.०० | ५८.६९ | ५८.६९ |
| | एकूण (अ + ब + क) | | १५०.०० | ०.०० | १५०.०० | १५०.०० |

मुळ प्रतिवर मा. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव यांची स्वाक्षरी आहे.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती हिंगोली.